नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

**दिनांक ११/१०/२०२२ (मंगळवार)**

**(सायंकाळ)**

---

# नागपूर जिल्हयातुन कोळसा चोरी करणारे सराईत गुन्हेगारांची टोळी हद्दपार

पो.स्टे. कन्हान येथील सराईत गुन्हेगार टोळी प्रमुख १) उमेश मारोतराव पानतावणे टोळी सदस्य २) बांलचंद्र हरीराम बिलोने ३) कुंदन ओमप्रकाश तिजारे ४) बादल अशोक चवरे ५) आकाश अशोक चवरे यांना कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये ६ महिन्याकरीता हद्दपार.

पोलीस स्टेशन कन्हान जिल्हा नागपूर ग्रामीण हद्दीमध्ये आपले गुन्हेगारी प्रवृत्तीने दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार टोळी प्रमुख १) उमेश मारोतराव पानतावणे वय ४९ वर्ष व त्याचे टोळीतील सदस्य बालचंद्र हरीराम बिलोने ३) कुंदन ओमप्रकाश तिजारे वय ३२ वर्ष ४) बादल अशोक चवरे वय ३० वर्ष ५) आकाश अशोक चवरे वय ३० वर्ष सर्व रा. कांद्री, कन्हान ता. पारशिवणी जिल्हा नागपूर यांचे विरुध्द नागपूर ग्रामीण पोलीसांनी कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदयान्वये कार्यवाही करुन त्यांना ६ महिन्याकरीता करीता नागपूर शहर व नागपूर जिल्हा ग्रामिण हद्दीतुन हद्दपार केले आहे.

सदर आरोपी हे टोळीने एकत्र येवुन पोलीस स्टेशन कन्हान परीसरातील गोंडेगांव कोळसा खदानीतील अवैद्यरीत्या कोळशाची चोरी करून त्याची विक्री करीत होते. त्याबाबत सदरचे आरोपीतांवर पो.स्टे. कन्हान येथे कोळसा चोरीचे सबंधाने एकूण १४ गुन्हे नोंद असल्याचे निर्देशनास आले आहे. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांमुळे परिसरातील राहणाऱ्या लोकांचे मनामध्ये प्रचंड दहशत निर्माण होवुन त्यांचे जिवीतास व शासकीय मालमत्तेस धोका निर्माण झालेला होता. सदर आरोपीतांचे कृत्ये लक्षात घेता त्यांचे गुन्हेगारी कृत्याला आळा बसविण्याकरीता सराईत गुन्हेगारांचे टोळी विरुध्द कलम ५५ महाराष्ट्र पोलीस कायदयांतर्गत श्री. विजयकुमार मगर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामिण यांनी दि. १०/१०/२०२२ रोजी त्यांचे विरूध्द नागपूर शहर व नागपूर जिल्हा ग्रामीण हद्दीतुन ६ महिन्याकरीता हद्दपारीची कारवाई केलेली आहे. सदरचा प्रस्ताव स्थानिक गुन्हे शाखाचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, प्रतिबंधक सेलचे पोउपनि श्री भारत थिटे, पोलीस हवालदार श्री सुनिल डोंगरे यांनी केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर